महाराष्ट्र शासन
आयुक्त
आज़ादी का अमृत महोत्सव
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

क्रमांक : संवैशिवसं/अतांत्रिक आस्थापना/ जाहिरात सूचना/१०२४/२०२६, दिनांक :०५/०२/ २०२६

# जाहिरातीची सूचना

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या आस्थापनेवरील १ पद तसेच क्षेत्रिय स्तरावरील प्रादेशिक कार्यालय नागपुर येथील १ पद अशी एकुण २ विधी अधिकाऱ्यांची पदे कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी अर्हता प्राप्त व अनुभवी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबतची सविस्तर जाहिरात,पात्रताविषयक निकष व विहित नमुन्यातील अर्ज संचालनालयाच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

टिप :-

१) वय, शिक्षण व अनुभव यांची दिनांक२३/०३ /२०२६ रोजी पुर्तता होणे आवश्यक आहे.

२) या संदर्भातील अटी व शर्तीमध्ये कोणतीही दुरुस्ती/ सुधारणा करण्याचे अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांनी राखुन ठेवले आहेत.

३) विहित नमुन्यातील अर्ज व्यक्तीश: अथवा पोच देय डाकेने सादर करण्याचा अंतिम दिनांक२३/०३/२०२६ राहील.

Digitally signed by
ANIL BHANDARI
Date: 28-02-2026
13:01:48

आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष

महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

क्रमांक : संवैशिवसं/अतांत्रिक आस्थापना/ जाहिरात सूचना/१०२४ /२०२६, दिनांक :०५/०३/ २०२६

प्रति,

संचालक,

माहिती व प्रसिध्दी संचालनालय,

नविन प्रशासकीय भवन,१७ वा मजला,

मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२

विषय :- संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या आस्थापनेवरील १ पद तसेच क्षेत्रिय स्तरावर दोन प्रादेशिक कार्यालयासाठी नागपुर येथील १ पद अशी एकुण २ विधी अधिकाऱ्यांची पदे कंत्राटी तत्वावर भरणेबाबत...

या पत्रासोबत पाठविण्यात येत असलेली जाहिरातीची सूचना जास्त खप असलेल्या अग्रगण्य वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात यावी, हि विनंती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कार्यालयाचे नाव व दुरध्वनी व ई-मेल पत्ता | वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई - ४००००१<br>दुरध्वनी क्रमांक :- ०२२ २२६२०३६१-६५<br>email : dbranchdmer@gmail.com |
| ०२ | जाहिरातीची सूचना प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख | ०९/०३/२०२६ |
| ०३ | प्रसिध्दीचे स्वरुप | राज्यस्तरीय |
| ०४ | प्रसिध्दीकरीता शिफारस करण्यात आलेले वृत्तपत्र | जास्त खप असलेल्या राज्यस्तरीय अग्रगण्य वर्तमानपत्रांमध्ये एक मराठी व एक इंग्रजी वर्तमान पत्रामध्ये |
| ०५ | किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे | एकवेळ |
| ०६ | देयक प्रदान करण्याकरीता कोणत्या नावाने पाठविण्यात यावे | आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष |

सोबत :- जाहिरातीची सूचना

Digitally signed by
ANIL BHANDARI
Date: 28-02-2026
13:01:22

आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई महाराष्ट्र

क्र. संवैशिवसं/आस्था- ३ रचना व कार्यपध्दती /विधी अधिकारी क.त.नियुक्तीबाबत / /२०२६ दिनांक - . .२०२६

## करार तत्वावर पदभरती

### करार/कंत्राटी पद्धतीने विधी अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत

१. संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई तसेच क्षेत्रिय स्तरावरील दोन प्रादेशिक कार्यालय नागपुर/औरंगाबाद यांच्याकडे प्रलंबित असलेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१६ रोजीच्या सा.प्र.वि शासन निर्णयानुसार सेवानिवृत्त विधी अधिकाऱ्यांकडुन सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. दि १७/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक / /२०२६ रोजी दुपारी वाजता संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, चौथा मजला सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, मुंबई येथे आयोजित करण्यात येईल.

| अ. क्र | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | विधी अधिकारी (वर्ग-२) (संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई १ पद व प्रादेशिक कार्यालयासाठी १ पद नागपुर) | २ | १) उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या कायद्याचा पदवीधर असावा व तो सनद धारक असावा.<br>२) शासकीय/निमशासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेले विधी अधिकारी.<br>३) उमेदवार सेवाविषयक व शैक्षणिक आस्थापना विषयक प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबत ज्ञानसंपन्न असावा. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.<br>४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.<br>५) विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. | ठोक मानधन ४०,०००/- |

*विधी अधिकारी यांची निवड :*

विधी अधिकारी यांची नियुक्ती, निवड समितीच्या अखत्यारित राहिल. तसेच आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई हे नियुक्ती प्राधिकारी राहतील.

*सर्वसाधारण अटी व शर्ती*

१. सदरची नेमणुक ही करार (कंत्राटी) पद्धतीने असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
२. सदर पदाची मुदत ११ महिने किंवा शासनस्तरावरून नियमित पद भरण्यात येईपर्यंत जे आधी घडेल ते राहील.
३. निवड झालेल्या उमेदवारास महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक: इएसबी-२०१०/प्र.क्र.४२/ई-८, दिनांक ६ एप्रिल २०११ व समक्रमांक दि. ३० जुलै २०११ च्या शासन निर्णयानुसार परिच्छेद-ब मध्ये नमुद केलेला करार करून द्यावा लागेल.
४. निवड झालेल्या उमेदवारास एकत्रित मानधन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्च या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.
५. सदर उमेदवाराच्या सेवा पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकारी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना राहतील.
६. उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवास धारक असावा.
७. मुलाखतीस येताना उमेदवाराने शैक्षणिक अर्हता व पुर्वानुभवाच्या संदर्भातील सर्व मूळ कागदपत्रे आणणे आवश्यक आहे.
८. उमेदवाराने विहित अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह मा. आयुक्त वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांच्या नावे हस्तपोच सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९. प्राप्त अर्जाची छाननी करुन मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी दि. . .२०२६ रोजी सूचना फलकावर अथवा वेबसाईटवर http://www.med-edu.in प्रसिद्ध केली जाईल.

१०. पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक . .२०२६ रोजी सकाळी वाजता घेतली जाईल. मुलाखतीच्या दिवशी उपस्थित न राहिलेल्या उमेदवारांची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

११. उमेदवाराने मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे.

१२. एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षपणे दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१३. जाहिरातीत प्ररिध्द करण्यात आलेल्या पदाची संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, महाराष्ट्र यांना राहतील.

१४. सदर निवडप्रक्रिया कोणत्याही क्षणी स्थगित करणे/ तहकूब करणे/ रद्द करणे इत्यादिचे अधिकार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई महाराष्ट्र यांनी राखून ठेवले आहेत.

१५. निवड केलेला उमेदवार कराराच्या कालवधीत वकीली व्यवसायांशी संबधित कोणत्याहि प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही जर नियुक्ती प्राधिकाऱ्याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवार खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यत किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१६. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दिनांक२१/०३/२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत विहित कागदपत्रांसोबत (साक्षांकित प्रती) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन व आयुष, मुंबई दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, चौथा मजला सेंट जॉर्जस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, मुंबई -१ येथे हस्तपोच सादर करावा.

*विधी अधिकारी यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या :*

१ संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या कार्यालयात प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक सर्व न्यायालयीन प्रकरणी / बाबींबाबत सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२.सेवाविषयक, शैक्षणिक व आस्थापना विषयक परिच्छेदनिहाय अभिप्राय (PARAWISE COMMENTS) तयार करणे / सेवाविषयक / प्रशासकीय सर्व बाबी / विभागीय चौकशी इत्यादी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्यांच्या सल्याने व मदतीने तयार करणे.

४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्या सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर करणे. तसेच न्यायालयात सुनावणीच्या वेळी व इतर अनुषंगिक न्यायालयीन कामकाजासाठी न्यायालयात उपस्थित राहणे.

५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे, योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलांकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे. तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी नेमुन दिलेली कामे पार पाडणे.

८. न्यायालयीन प्रकरणांबाबत न्याययालयाकडून प्रकरणाच्या लागणाऱ्या तारखा पहाणे व संबंधित अधिकारी व कार्यासनास अवगत करावे.

सही /-

( आयुक्त )

दिनांक :-

वैद्यकीय शिक्षण व संशोधन

# *अर्जाचा नमुना*

*उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे*

अर्ज केलेल्या पदाचे नाव

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नाव | |
| २ | अर्जदाराचा संपूर्ण पत्ता | |
| ३ | दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | जन्मदिनांक व अर्जाच्या दिनांकाचे वय | |
| ५ | शैक्षणिक अर्हता | |
| ६ | अनुभवाचा तपशिल<br>१. सेवानिवृत्त असल्यास कार्यालयाचे नाव वसेवानिवृत्तीचा दिनांक<br>२.कार्यरत असल्यास कार्यालयाचे नाव | |
| ७ | जात व पोटजात | |

उपरोक्त पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्तीबाबतची जाहिरात / सुचना मी काळजीपूर्वक वाचली असून, सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी